# संकरीत ज्वारीच्या किंमती स्थिर राहण्याची संभावना

गहू, भात, मका, व बार्ली या नंतर पाचव्या क्रमांकावरती येणारे ज्वारी हे महत्वाचे तृणधान्य पिक आहे. इथोपिया किंवा पूर्व, मध्य आफ्रीका हे ज्वारीचे मुळ उगमस्थान मानले जाते. ज्वारीच्या उत्पादनात आफ्रीकेचा सर्वात जास्त वाटा असून अमेरीकेमध्ये ज्वारीचे जवळ जवळ १७ टक्के उत्पादन घेतले जाते. अमेरीका हा ज्वारीचा मोठा निर्यातदार देश आहे.

भारतात ज्वारीचे उत्पादन प्रामुख्याने द्वीपकल्प व मध्य भारतात केंद्रीत झालेले आहे. महाराष्ट्र, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, गुजरात, राजस्थान, उत्तरप्रदेश (बुंदेलखंड भाग) आणि तामिलनाडू हे ज्वारीचे प्रमुख उत्पादक राज्ये आहेत. उर्वरीत राज्यांमध्ये ज्वारी प्रामूख्याने चारा पिक म्हणून घेतले जाते.

सध्या भारतामध्ये महाराष्ट्र ज्वारीचे एक प्रमूख उत्पादक राज्य आहे. महाराष्ट्रामध्ये ज्वारीची पेरणी जून महिन्यात होते व जूलै पर्यंत सूरू राहते तर कापणी ऑक्टोबर महिन्यात केली जाते. ज्वारीची बाजारातील आवक ऑक्टोबर महिन्यात सूरू होते. खामगाव, लातूर, जलंब, बार्शी, अक्कलकोट, मोहोड, पंढरपूर, कुर्डूवाडी, मुंबई व कोल्हापूर हे ज्वारीचे महाराष्ट्रातील प्रमूख व्यापारी केंद्रे आहेत.

कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमूख कृषि विद्यापीठ, अकोला येथिल एन.ए.आय.पी, कृषि विपणन माहिती केंद्राने संकरीत ज्वारीच्या खामगाव बाजारपेठेतील मागील २२ वर्षाच्या म्हणजेच जानेवारी १९९१ ते मे २०१३ या कालावधीतील मासीक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार बाजारातील चालू स्थिती कायम राहिल्यास, समतोल हवामानात वेगवेगळया प्रतीनूसार ऑक्टोबर २०१३ या महिन्यात संकरीत ज्वारीच्या सरासरी किंमती रु. ११५० ते रु. १३०० प्रति क्विंटल राहण्याची शक्यता आहे. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

ऑक्टोबर महिन्यात कापसाच्या किंमती ४००० ते ४४०० रु. प्रति क्विंटल राहण्याची संभावना

देशाच्या आर्थिक विकासात महत्वाचे योगदान देणारे कापूस हे एक महत्वाचे नगदी पिक आहे जे ‘‘पांढरे सोने’’ म्हणून ओळखले जाते. कापसाखालील क्षेत्राच्या बाबतीत जगात भारताचा प्रथम तर उत्पादनात चीन नंतर दूसरा कमांक लागतो. महाराष्ट्र, गुजरात, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश, पंजाब, हरीयाणा, राजस्थान आणि कर्नाटक हे भारतातील प्रमुख कापूस उत्पादक राज्ये आहेत. महाराष्ट्रामध्ये कोरडवाहू कापसाची पेरणी नैॠत्य मोसमी वाऱ्याच्या आगमनानंतर तर बागायती कापसाची पेरणी २० मे ते ३० मे दरम्यान केली जाते. तसेच वेचणी ऑक्टोबर मध्ये सूरू होउन जानेवारी – फेब्रूवारीपर्यंत वेगवेगळया वेचण्यांत केली जाते. नागपूर, नरखेड, नांदेड, यवतमाळ, हिंगणघाट, वर्धा, पूलगांव, अकोला, अमरावती, मुर्तीजापूर, औरंगाबाद, धूळे, जळगांव, हे महाराष्ट्रातील कापसाचे प्रमुख बाजार आहेत.

कापूस हे राज्यातील महत्वाचे नगदी पिक आहे आणि शेतकरी येणाऱ्या हंगामातील किंमती जाणून घेण्यास उत्सुक आहेत. शेतकऱ्यांना पेरणीचा योग्य निर्णय घेता यावा या दृष्टीने कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला येथिल एन.ए.आय.पी, कृषि विपणन माहिती केंद्राने कापसाच्या अकोट बाजारपेठेतील मागील १० वर्षाच्या म्हणजेच डिसेंबर २००२ ते एप्रिल २०१३ या कालावधीतील मासीक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार बाजारातील चालू स्थिती कायम राहील्यास, सामान्य हवामानात ऑक्टोबर २०१३ या महिन्यात कापसाच्या सरासरी किंमती रु. ४००० ते रु. ४४०० प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता आहे. केंद्र सरकारच्या कापूस निर्यात धोरणात काही बदल झाल्यास त्याचा परिणाम या संभावित किंमतीवर होऊ शकतो. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

# तोडणीच्या वेळेस खरीप उडीदाच्या किंमती रु. ३२०० ते रु. ३४०० प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता

भारतानंतर म्यानमार आणि थायलंड उडीदाचे उत्पादन घेणारे प्रमुख देश आहेत. भारतातील उडीदाचे उत्पादन अंतर्गत गरज भागविण्यास अपुर्ण असल्यामुळे या कडधान्य पिकाचा भारत एक प्रमुख आयातदार देश आहे. भारत, चीन, पाकिस्तान आणि जपान हे उडीदाचे प्रमुख आयातदार देश आहेत. म्यानमार, सिंगापूर, थायलंड, न्युझीलंड, हॉंगकॉंग, श्रीलंका आणि पाकिस्तान हे उडीदाचे प्रमुख निर्यातदार देश आहेत. भारत एकुण आयातीच्या जवळजवळ ८५ टक्के उडीदाची गरज म्यानमार व त्यानंतर सिंगापूर व थायलंड यांच्याकडून भागवितो.

मध्यप्रदेश, उत्तरप्रदेश, पंजाब, महाराष्ट्र, पश्चिम बंगाल, आंध्रप्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक हे भारतातील उडीदाचे प्रमुख उत्पादक राज्य आहेत. उडीदाखालील क्षेत्राच्या दृष्टीने आंध्रप्रदेश राज्याचा प्रथम क्रमांक असून त्या पाठोपाठ ओडीसा आणि तामिळनाडू यांचा क्रमांक लागतो. उत्पादनाच्या बाबतीत उत्तर प्रदेश भारतात प्रथम क्रंमाकावरती असून एकूण उत्पादनाच्या १९ टक्के उत्पादन उत्तर प्रदेशात होते. त्या पाठोपाठ आंध्रप्रदेश (१८ टक्के), छत्तीसगड (१६ टक्के) आणि महाराष्ट्र (९ टक्के) यांचा क्रमांक लागतो.

अकोला व लातूर हे महाराष्ट्रातील उडीदाचे प्रमुख व्यापारी केंद्रे आहेत. विदर्भात उडीदाची पेरणी ७ जून ते २१ जून दरम्यान केली जाते. तर तोडणी ऑगस्टच्या शेवटच्या आठवडयात (१५ ते ३० ऑगस्ट दरम्यान) केली जाते. बाजारातील आवक १५ सप्टेबंर नंतर सूरू होऊन पुढील ४ महिन्यापर्यंत चालू असते.

कृषी अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील एन. ए. आय. पी. ,कृषी विपणन माहिती केंद्राने लातूर बाजारपेठेतील उडीदाची मागील १५ वर्षाची म्हणजेच जानेवारी १९९८ ते मे २०१३ आणि अकोला बाजारपेठेतील उडीदाची मागील १८ वर्षाची म्हणजेच जानेवारी १९९५ ते मे २०१३ या कालावधीतील मासीक सरासरी किंमतींचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानूसार जर बाजारातील चालू स्थिती कायम राहील्यास सामान्य हवामानात, वेगवेगळया प्रतिनूसार सप्टेंबर २०१३ मध्ये उडीदाच्या किंमती रु.३२०० ते रु. ३४०० प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता आहे. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

# तोडणीच्या वेळेस तुरीच्या किंमती रु. ४२०० प्रति क्विंटल जवळपास राहण्याची शक्यता

तुरीचे उत्पादन उष्ण व समशितोष्ण कटीबंधीय प्रदेशात, विशेषत: दक्षिण अशिया, पूर्व व दक्षिण आफ्रिका, लॅटीन, मध्य व दक्षिण अमेरीका यामध्ये घेतले जाते. भारत, म्यानमार, मालावी, युगांडा, केनीया, टांझानिया, नेपाळ, डेमोनिका रिपब्लीक, कांगो, बांगलादेश, हैती, पनामा इत्यादी तुरीचे प्रमुख उत्पादक देश आहेत. म्यानमार, डेमोनिका रिपब्लीक आणि मालावी हे तुरीचे प्रमुख निर्यातदार देश आहेत. तर भारत, त्रिनिनाद, व्हेनुझ्युएला, नेपाळ आणि मॉरेशिअस हे प्रमुख आयातदार देश आहेत. एकूण जागतीक कडधान्यखालील क्षेत्र व उत्पादनात तुरीचा वाटा प्रत्येकी ६.५ टक्के व ५.७ टक्के एवढा आहे. भारत प्रमुख तुर उत्पादक देश असून जागतीक तूर उत्पादनाच्या ६४ टक्के उत्पादन भारतात होते. त्यापाठोपाठ म्यानमार (२२टक्के) आणि मालावी (६टक्के) यांचा क्रमांक लागतो.

इतर कडधान्य पिकाप्रमाणे तुर सुध्दा कोरडवाहू पिक म्हणून घेतले जाते आणि तुरी खालील ९६ टक्के क्षेत्र असिंचीत आहे. तुरीखालील क्षेत्र व उत्पादन बाबतीत भारतात महाराष्ट्राचा प्रथम क्रमांक लागतो. जळगाव, लातूर, औरंगाबाद, मुंबई, अकोला, बार्शी, नागपूर, हे महाराष्ट्रातील तुरीचे प्रमुख व्यापारी केंद्रे आहेत.

कृषी अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील एन. ए. आय. पी., कृषी विपणन माहिती केंद्राने तुरीच्या लातूर व अकोला बाजारपेठेतील मागील १३ वर्षांचा म्हणजेच जानेवारी २००० ते मे २०१३ या कालावधीतील मासीक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानूसार बाजारपेठेतील चालू स्थिती कायम राहिल्यास सामान्य हवामानात, वेगवेगळया प्रतिनूसार तुरीचे डिसेंबर-जानेवारी २०१४ या महिन्यात सरासरी किंमती जवळपास रु. ४२०० प्रति क्विंटल राहण्याची शक्यता आहे. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

# ऑक्टोबर २०१३ मध्ये सोयाबिनच्या किंमती रु. ३४०० प्रति क्विंटल जवळपास राहण्याची शक्यता

सोयाबिन हे एक प्रकारचे कडधान्य असून ते २१ व्या शतकातील ''गोल्डन बीन'' किंवा ''मिरॅकल बीन'' म्हणून ओळखले जाते. परंतू सोयाबिनचे कडधान्य पिक म्हणून वर्गीकरण केल्यापेक्षा तेलबिया पिक म्हणूनच वर्गीकरण केले जाते. सोयाबिन हे उत्तम प्रतिचे तेल व प्रथिने यांचे स्त्रोत आहे. सोयाबिन मध्ये सरासरी ४० टक्के प्रथिने व १८-२० टक्के तेलाचे प्रमाण असते.

अमेरीका सोयाबिनचा प्रमुख उत्पादक देश असून उत्पादनाच्या बाबतीत जगात प्रथम क्रमांकावरती आहे. सोयाबिन उत्पादनात भारताचा पाचवा क्रमांक असून जगाच्या ३ ते ४ टक्के उत्पादन भारतात होते. सोयाबिनचे क्षेत्र, उत्पादन आणि उत्पादकतेच्या बाबतीत मध्यप्रदेश राज्याचा प्रथम क्रमांक लागतो त्या पाठोपाठ महाराष्ट्र व राजस्थान या राज्यांचा क्रमांक लागतो. मध्यप्रदेशातील इंदौर, सागर व इटारसी, महाराष्ट्रातील अकोला, वाशीम, लातूर आणि नागपूर तर राजस्थानातील कोटा हे सोयाबिनचे प्रमुख व्यापारी केंद्रे आहेत.

महाराष्ट्रात सोयाबिन हे खरीप पिक म्हणून घेतले जाते. सोयाबिनची तोडणी १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान केली जाते तर बाजारातील आवक ऑक्टोबर मध्ये सूरू होते. कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग. डॉ. पंजाबराव देशमूख कृषि विद्यापीठ, अकोला येथील एन.ए.आय.पी, कृषि विपणन माहीती केंद्राने सोयाबिनच्या लातूर, अकोला आणि वाशीम बाजारपेठेतील मागील १० ते १५ वर्षाच्या कालावधीतील मासीक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार बाजारातील चालू स्थिती कायम राहील्यास, सामान्य हवामानात मालाच्या वेगवेगळया प्रतीनुसार ऑक्टोबर २०१३ या महिन्यात सोयाबिनच्या सरासरी किंमती जवळपास रु. ३४०० प्रती क्विंटल राहण्याची शक्यता आहे. खाद्य तेलाच्या आयातीवर कर लादल्यास व कच्च्या तेलाच्या किंमतीत वाढ झाल्यास सोयाबिनच्या किंमती वाढू शकतात. सोयामिलची निर्यात सुध्दा सोयाबिनच्या किंमतीवर परीणाम करू शकते. ही माहीती शेतकरी बंधूंना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

# तोडणीच्या वेळेस खरीप मुगाच्या किंमती रु. ४५०० ते रु. ४८०० प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता

भारत, चीन, थायलंड, फिलीपांईन्स, व्हिएतनाम, इंडोनेशिया, बर्मा आणि बांग्लादेश तसेच दक्षिण युरोप व दक्षिण अमेरीकेच्या उष्ण व कोरडया भागांमध्ये मुगाचे उत्पादन घेतले जाते.

भारतात मुग प्रामुख्याने दोन हंगामात घेतला जातो, खरीप आणि उन्हाळी हंगाम, तथापी बाजारातील प्रमुख आवक सप्टेंबर ते ऑक्टोबर (खरीप हंगामा करीता) आणि जून- जुलै मध्ये (उन्हाळी हंगामाकरीता) सूरू होते. राजस्थान, महाराष्ट्र, गुजरात, कर्नाटक, आंध्रप्रदेश, मध्यप्रदेश आणि उत्तरप्रदेशात मुग प्रामुख्याने खरीप पीक म्हणून घेतले जाते. तर तामिळनाडू, पंजाब, हरियाणा, उत्तरप्रदेश आणि बिहार या राज्यांमध्ये उन्हाळी पीक म्हणून घेतले जाते.

खरीप हंगामातील मुगाचे पिक हे प्रमुख पिक तसेच आंतरपिक म्हणून घेतले जाते. मुग प्रामुख्याने कोरडवाहू पिक असल्याने त्याची पेरणी सामन्यत: मौसमी पावसाच्या आगमनानंतर वेगवेगळया राज्यात होते. मुगाची पेरणी मध्य जून ते जुलै चा दुसरा आठवडा यादरम्यान केली जाते. महाराष्ट्र हे मुगाचे प्रमुख उत्पादक राज्य आहे.

अकोला, लातूर, अमरावती आणि जळगाव हे महाराष्ट्रातील मुगाचे प्रमुख व्यापारी केंद्रे आहेत. विदर्भात मुगाची पेरणी जून महिन्यात केली जाते तर तोडणी ऑगस्ट महिन्यात केली जाते. बाजारातील आवक सप्टेंबर महिन्यात चालू होते.

कृषी अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथील एन. ए. आय. पी., कृषी विपणन माहिती केंद्राने मुगाच्या अकोला बाजारपेठेतील मागील बारा वर्षाच्या म्हणजेच जानेवारी २००१ ते मे २०१३ या कालावधीतील मासिक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानुसार बाजारातील चालू स्थिती कायम राहिल्यास, सामान्य हवामानात, वेगवेगळया प्रतिनूसार सप्टेंबर २०१३ या महिन्यात मुगाच्या सरासरी किंमती रु. ४५०० ते रु. ४८०० प्रति क्विंटल दरम्यान राहण्याची शक्यता आहे. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.

# कापणीच्या वेळेस खरीप मकयाच्या किंमती रु. १२०० प्रति क्विंटल जवळपास राहण्याची शक्यता

मका हे जागातील महत्वाचे तृणधान्य पिक आहे. मागील पाच वर्षापासून मक्याच्या मागणीत मोठया प्रमाणात वाढ झालेली आहे. भारतात मास व कुक्कूटपालन उद्योगात झालेल्या वाढीमूळे मक्याची कुक्कूट खाद्य म्हणून मागणी जास्त प्रमाणात आहे. बाजारपेठेत येणा-या एकूण आवक पैकी ७५ टक्के मका हा कुक्कूट खाद्य म्हणून कुक्कूटपालन उद्योगात वापरला जातो आणि २० टक्के मका स्टार्च उद्योगात वापरला जातो. तसेच उरलेला मका अल्कोहोल तयार करण्यास वापरला जातो.

अमेरीका मक्याच्या उत्पादनात प्रथम क्रमांकावरती असून जागतीक मक्याच्या उत्पादनापैकी जवळजवळ ४० टक्के उत्पादन अमेरीकेत होते. चीन दुस-या क्रमांकावरती असून मक्याची मोठया प्रमाणात (वर्ष २०११ मध्ये ६ दशलक्ष टन) आयात करतो. अमेरीका मक्याचा मोठा निर्यातदार देश आहे.

भारत मक्याच्या उत्पादनात पाचव्या क्रमांकावरती असून जागतीक उत्पादनाच्या ३ टक्के उत्पादन भारतात होते. तर मक्याचा जागतीक व्यापारात भारताचा २ टक्के सहभाग आहे. आंध्रप्रदेश राज्य मक्याच्या उत्पादनात प्रथम क्रमांकावरती असून एकूण मक्याच्या उत्पादनापैकी २१ टक्के उत्पादन आंध्रप्रदेशात होते, त्या पाठोपाठ कर्नाटक (१६ टक्के), राजस्थान (१० टक्के), बिहार व  महाराष्ट्र (प्रत्येकी ९ टक्के) आणि उत्तरप्रदेश व मध्यप्रदेश (प्रत्येकी ६ टक्के) या राज्यांचा क्रमांक लागतो.

सांगली, धुळे, सातारा, नंदूरबार, पंढरपूर, चाळीसगाव, मालेगांव, चिखली, लातूर, अकलूज, दोंडाईचा, औरंगाबाद आणि नाशिक या मक्याच्या महराष्ट्रातील प्रमुख बाजारपेठा आहेत. मक्याची कापणी १ ऑक्टोबर ते १५ ऑक्टोबर दरम्यान होते. तर बाजारात आवक ऑक्टोबरच्या दुस-या पंधरवाडयात सूरू होते.

कृषी अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ अकोला येथील एन. ए. आय. पी. कृषी विपणन माहिती केंद्राने मक्याच्या धुळे बाजारपेठेतील मागील १२ वर्षाचा म्हणजेच जानेवारी २००१ ते मे २०१३ या कालावधीतील मासीक सरासरी किंमतीचे पृथ्थकरण केले. केलेल्या अभ्यासाच्या निष्कर्षानूसार बाजारपेठेतील चालू स्थिती कायम राहिल्यास सामान्य हवामानात, वेगवेगळया प्रतिनूसार मक्याचे ऑक्टोबर २०१३ या महिन्यात सरासरी किंमती रु. १२०० प्रति क्विंटल जवळपास राहण्याची शक्यता आहे. निर्यात धोरणात झालेले बदल व कुक्कूटपालन उद्योगावर अचानक आलेले रोग हे संभावित किंमतीवरती परिणाम करू शकतात. हि माहिती शेतकरी बंधुना पिक पेरणीचा व निविष्ठा वापराचा योग्य निर्णय घेण्यास उपयुक्त ठरेल.